Indian Streams Research Journal
Vol.1,Issue.XII/Jan; 2012 प्रा.केशव धोंडिबा टिपरसे ISSN:-2230-7850

## Research Papers

# बखर वाङ्मयात प्रतिबिंबित झालेले तत्कालीन समाज जीवन

**प्रा.केशव धोंडिबा टिपरसे**
बाबा नाईक महाविद्यालय, कोकरुड , ता.शिराळा, जि.सांगली.

**प्रास्ताविक**

मराठी वाङ्मयाच्या इतिहासात बखर वाङमयाला फार महत्त्व आहे. काव्याच्या तुलनेने मराठी गद्याची निर्मिती अत्यल्प झाल्याचे जाणवते. असे असून ही ऐतिहासिक व वाङ्मयीन दृष्टिकोनातून बखरीचे महत्त्व हे अनन्यसाधारण असेच आहे. मराठी गद्याचा विचार करताना आपणास महानुभवाची ग्रंथ संपदा बाजुला करता येतच नाही इ.स.१३ व्या शतकात त्यांनी मराठी भाषेसाठी अतिशय महत्वाचे ग्रंथ निर्माण करुन फार मोठे उपकार करुन ठेवले आहेत ते कोणीच विसरु शकते नाही.

बखर वाङमयाची निर्मिती ही महानुभाव संप्रदायाच्या नंतर चार पाचशे वर्षानंतर झाली. मराठीशाहीच्या उदयाबरोबर बखर वाङमयाने लक्षणीय रुप धारण केले आणि पेशवाईत तो प्रकार समृध्द झाला. तसेच काळाबरोबर याला उतरती कळा ही लागली.साहित्य हे समाजाचे अपत्य असते असे म्हणतात हे बखर वाङ्मयाला लागू पडते. काळ व त्या काळातील माणसे, त्याचे कर्तृत्त्व व त्या निमिताने तत्त्कालीन मानवी जीवन आणि सांस्कृतिक घडामोडीतून एखादा वाङ्मय प्रवाह निर्माण होतो. त्या काळातील कर्तृत्व व सांस्कृतिक वातावरण यांच्या बरोबर त्या वाङ्मयाच्या अभ्यासावरुन लक्षात येते त्याचा आधार घेऊन काही बखरीतील तत्कालीन समाज जीवनाचा शोध घेण्याचा प्रयत्न या शोधनिबंधात घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**बखर म्हणजे काय :-**

बखर म्हणजे काय या बद्दल विद्वानात विविध मत-मतांतरे आहेत. 'बखर' म्हणजे वार्ता, समाचार, हकिगत, वृत्र या अरबी शब्दाच्या अर्थाचा विपर्यास्त होऊन 'बखर' या शब्दाची निर्मिती झाली, तर 'बक' म्हणजे बकणे,बोलणे अशीही उत्पत्ती वि.का.राजवाडे यांनी सांगितलेली आहे. मेजर कॅन्डी यांनी बखरीबद्दल 'A written narrative or history on prakrit prose' असा विचार सांगितलेला आहे. बखर या शब्दाचा रुढ अर्थ 'राजकिय स्वरुपाचे ऐतिहासिक लेखन' असा आहे. गद्यातील इतिहास असे ही त्याचे स्वरुप असू शकते प्राचीन मराठीतील विवक्षित गद्य वाङ्मयाला 'बखर' म्हणून ही संबोधले जाते. मुस्लीम राजवटीत तवारिखा लिहिण्याची पध्दत होती म्हणून मुसलमानाच्या सहवासाने त्यांच्या तवारिखा पाहुण मराठयानी ही 'बखरी' लिहिण्याची पध्दत सुरु केली. एकूणच बखर वाङ्मयाची निर्मिती ही चरित्र, आख्यान वा वंशानुचरित्र, कधी कैफियत, हकगित, वृतांत अखबार म्हणून ही लिहिली जाते. इतिहासातील वस्तुनिष्ठ पण तपशिलवार असा कलात्मक आणि सौदंर्यपूर्ण आविष्कार म्हणजे 'बखर' होय.

**बखरीतून प्रतिबिंबित झालेले तत्कालीन समाज जीवनाचे दर्शन :-**

'बखर' हा मराठी वाङ्मयातील गद्य प्रकार आहे. याचा इतिहास ही खूप मोठा आहे. मराठयाच्या इतिहासातील बऱ्याचशा घटनावर, प्रसंगावर 'बखर' लेखन झालेले आपणास दिसते. प्रामुख्याने बखरचे आपणास पाच वर्ग पाडता येतात यामध्ये पौराणिक सांप्रदायिक बखरी, ऐतिहासिक बखरी, समकालीन बखरी, उत्तरकालीन बखरी व बखरसदृश ऐतिहाकि स्वरुपाचे लेखन या सर्वच प्रकारच्या बखरीतून तत्त्कालीन समाज जीवनाचे दर्शन आपणास होते. असे असले तरी या शोधनिबंधात बखरीतील राजकिय व सामाजिक जीवनाचाच शोध घेण्याचा प्रयत्न केला आाहे.

बखर वाङ्मयात सर्वात जुनी बखर म्हणून महिकावतीची बखर ओळखली जाते ही बखर शिवपूर्वकाळामधील आहे. या बखरीचे स्वरुप हे गद्यपद्यमय असे आहे. या बखरीमध्ये सात राजवटीच्या कारभाराची माहिती मिळते. कोकण भागाची माहिती ही या बखरीतून मिळते आणि त्यातूनच कोकणचा इतिहास प्रकाशित झ ााला. या बखरीमध्ये तत्त्कालीन संरक्षण व्यवस्था, जमिन मोजण्याची पध्दती, राज्यव्यवस्था व सैन्यव्यवस्था याची सविस्तर माहिती मिळते. त्याबरोबर तत्त्कालीन वरील राजवटीतील कारभाराची गावाची नावे, किल्ल्यांची नावे यांची माहिती मिळते. राक्षेसतागडीची बखर यामध्ये दक्षिणेमधील त्याकाळातील एकमेव हिंदू राज्य विजयनगर याच्या विध्वस कसा झाला याची माहिती मिळते. त्याबरोबरच राज्य दरबारातील पागा, पीलखाना, उस्तरखाना इत्यादीमधून सरंजामाची कल्पना येते. शिवकाळात तर फार मोठया प्रमाणात 'बखर' लेखन झाले आहे. त्यात सभासदाची बखर अतिशय महत्त्वाची मानली जाते. कारण या बखरीमध्ये छत्रपती शिवाजी महाराजाचे चरित्र आले आहे. त्याबरोबरच तत्त्कालीन राजकिय व सामाजिक जीवनाचा मोठापट उलगडत जातो. अफझलखानाचा वध, शिवाजी महाराजाचे प्रशासन, मुलकी कारभार, शिवराज्याभिषेक, शाहिस्तेखानाची स्वारी, आग्राभेट व सुटका, भागानगर भेट, व्यंकोजीची भेट इत्यादी राजकिय घटनाचे वर्णन सविस्तरपणे आले आहे. हवलदार, किल्लेदार, आठरा कारखाने, खजिना, शिवबंदी, कारकुन, हुजरे, सबनीस, कारखानीस, गडा, कोट इत्यादीचा तपशिल विस्तृतपणे आहे. भोसलेवंशचरित्र या बखरीतून तंजावरच्या भोसले घराण्याच्या इतिहासाची माहिती मिळते. छ.शिवाजी महाराजाच्या पूर्वीच्या चौदा पिढयांची माहिती या बखरीतून मिळते. शिवदिग्विजय या बखरीतून शिवाजी महाराजाच्या चरित्राबरोबरच तत्त्कालीन राजकिय घडामोडीचे दर्शन घडते. श्री शिवाजीप्रताप, शेडगावकर बखर, एक्याण्णव कलमी बखर या सर्व बखरी शिवकालीन असल्याने यामध्ये छ.शिवाजी महाराजाचे चरित्र व तत्त्कालीन राजकारण या दोन गोष्टी या बखरीत महत्त्वाच्या आहेत. शिवकाळात बखर लेखनामध्ये आघाडीचे नाव म्हणजे मल्हार रामराव चिटणीस, हे होते. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजावर बखर लेखन केले. त्यातील उल्लेखनिय बखर म्हणजे शिवछत्रपतीचे सप्तप्रकरणात्मक चरित्र ही होय. यामध्ये छ.शिवाजी महाराजाच्या जीवनातील विविध घटनाचे वर्णन आले आहे. शिवाजी महाराजाचे बारा महाल, प्रशासन व्यवस्था, कारभाराची विभागणी, किल्ल्याचा बंदोबस्त, तोफखाना, पायदळ व्यवस्था, देवस्थानाची व्यवस्था, युद्ध साधने, जमिन वितरणाची व्यवस्था धोरणे, राजदरबारातील व्यवस्था, चालीरीती, राजनिती याची माहिती मिळते तत्त्कालीन राजकिय व सामाजिक जीवनाचे सखोल दर्शन घडवणारी ही बखर श्रेष्ठ ठरते.

शिवकाळातील बखरीचा विषय हा शिवचरित्र दिसतो. परंतु पेशवेकाळातील बखरी मध्ये मात्र विषयाच्या बाबतीत विविधता आढळते. पेशवेकाळातील अतिशय महत्वाची घटना म्हणजे पानिपतचे युद्ध ही होय. आणि या घटनेलाच केंद्रस्थानी ठेवून या काळातील बऱ्याचशा बखरीचे लेखन झाले आहे. पानिपतची बखर यामध्ये पानिपतच्या लढाईचे सविस्तर वर्णन आलेले आहे. यामध्ये मराठयाच्या लढाईची नीती, वापरलेली शस्त्रे, डावपेच यामध्ये स्पष्ट होते. विश्वासराव, भाऊसाहेब आणि अहमदशाह अब्दाली यांच्यातील राजकीय युध्द, सत्तासंघर्ष दिसतो. तसेच तत्कालिन मराठयातील अंतर्गत कलहाचे दर्शन ही बखरीतून होते. तसेच मराठे व अहमदशहा दुराणी यांच्या ही संघर्षाचे चित्रण बखरीत आले आहे. तर भाऊसाहेबाची बखर कृष्णाजी शामराव यांनी लिहिलेल्या बखरीतून पानिपत युद्धाचे अतिशय सविस्तर वर्णन पहायला मिळते. मराठयांच्या बंडाळया, पानिपतयुध्दाच्या पूर्वीचे मराठयांच्या राजकारणाचे प्रतिबिंब यामध्ये आहे. तत्त्कालीन बऱ्याचशा महत्वाच्या ऐतिहासिक व राजकिय घटनाच्या माहितीवरुन तत्त्कालीन समाजजीवनाची कल्पना यामधून येते. पानिपतच्या युद्धामुळे मराठे पूर्णतः हरले त्यामध्ये मोठया प्रमाणात मनुष्य व वित्त हानी झाली. एक लाख बांगडी फुटली. माधवराव यांना गादीवर बसविले. पण

मराठी साम्राज्याला अंतर्गत बंडाळीची लागलेली कीड याचे वर्णन या बखरीतून येते. माधवरावाची आत्महत्या, वसईचा तह, इंग्रजाचा प्रवेश, कोळी, रामोशी याचा बंड यातून फार मोठया प्रमाणात मराठयाची हानी झाली. याचे वर्णन येते राजातील लोकांनी आपल्याच राजाची लुट सुरु केली. त्यानंतर समाजामध्ये अस्थिरता माजली. त्यानंतर दुसरा बाजीराव पेशवा गादीवर आला तो रंगेलाचा बादशाह म्हणून ओळखला जात होता. स्त्रीयामध्येच त्याचा वेळ जात होता राजकारभाराकडे लक्ष दिले नाही असे वर्णन या बखरीत सामाजिक व राजकीय जीवनाच्या अनुषगांने आले आहे.

मराठीतील पहिली बखर म्हणून महीकावतीच्या बखरीचा उल्लेख केला जातो. या बखरीमध्ये धर्माचे वर्णन येते कारण तत्कालीन समाजव्यवस्था ही धर्माजित होती. म्हणून साहित्य आणि धर्म याची सांगड घालण्याचा प्रयत्न बखरकारानी केला आहे. एवढेच नवे तर या धर्माच्या रक्षणासाठी बखरीचे लेखन केले आहे. असे ही म्हणतो सभासदाच्या बखरीमध्ये ही समाजाचा धार्मिक दृष्टिकोन आलेला आहे. छ.शिवाजी महाराजाच्या अंगामध्ये भवानी मातेचा संचार होणे, पृथ्वीकंप होणे, उल्कापात झाला, श्रीशंभु महादेवाच्या तळयातील उदक रक्तांबर झाले. अशा प्रकारचे दृष्टीकोन आणि तत्त्कालीन अंधश्रध्दाळू मनाचे दर्शन होते. सभासदाच्या बखरीचा शेवट करताना फलप्राप्ती सांगितली आहे. शिवछत्रपतीचे सप्तप्रकरणात्मक चरित्र या बखरीत छ.शिवाजी महाराजानी अवतार घेऊन धर्म स्थापन केल्याचा उल्लेख आला आहे. मल्हार चिटणीस यांनी तर आपल्या बखरीत शिवाजी महाराजाना अवतारी पुरुष मानले आहे.पाणिपतच्या बखरीमध्ये पाणिपतचे युद्ध हे बखरकारांच्या लिखानात केंद्रस्थानी असले तरी युद्धाच्या पराभवास धार्मिक भावना कारणीभूत आहे असे बखरकार सांगतो कारण युध्दावरील सैनिक गंगा नदी जवळ जाऊन नदीत स्नान करुन पुण्य मिळण्याचा प्रयत्न करीत नाही असे म्हणतो.

**समारोप :-**

सर्व प्रकारच्या बखर गद्य वाङ्मयामधून प्रामुख्याने तत्त्कालीन समाज धार्मिकता, धर्मातील अराजकता, कर्मकांड, शकून, नवस सायस, काळी-पांढरी जादू, अंगारे-धुपारे यातच गुरुफटलेला होता. धर्माचे ज्ञान सांगणाऱ्यानी धर्म आपल्या उपजिविकेचे साधन केले. धार्मिक स्तोम माजले बखर लेखनाच्या काळात संताचा धर्म विचार बाजूला गेलेला दिसतो स्वधर्माला महत्व देऊन आणि रीतीरिवाजाप्रमाणेच समाज चालत होता. अशा प्रकारचे बखरीमधून तत्कालिन राजकिय जीवन हे या काळात सर्वत्र केंद्रस्थानी होते समाजात मोठया प्रमाणात रुढी, अंधश्रध्दा माजल्या होत्या परंतु त्याची चिकित्सा करण्याचा प्रयत्न कोणीही केलेला नाही. अशा प्रकारचे समाज जीवन बखरीमध्ये प्रतिबिंबीत झालेले दिसते.

**संदर्भ ग्रंथसूची :-**

१) मराठी बखर वाङ्मयाचा पुनर्विचार, डॉ.ग्रामोपाध्ये, मेहता पब्लिकशिंग हाऊस, पुणे, १९८६
२) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, ल.रा. नसिराबादकर, फडके प्रकाशन, कोल्हापूर
३) मराठी बखर, हेरवाडकर र.वि.व्हीनस प्रकाशन पुणे, १९५७
४) बखर वाङ्मय, उदगम आणि विकास डॉ.बापूजी संकपाळ, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे,१९८२
५) मध्यमयुगीन वाङ्मयीन प्रवाह, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक.
६) सभासदाची बखर, डॉ.य.म.पठाण, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, २०००
७) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, ल.रा.नसिराबादकर, फडके प्रकाशन, कोल्हापूर